Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# शिवरायांचे आदर्श व्यक्तिमत्व



**आशा सुभाष पाटील**
संशोधक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा यूनिवर्सिटी औरंगाबाद
Email : ajpatil1180@gmail.com

## प्रस्तावना :

आज छत्रपती शिवाजी महाराज आपल्यातून जाऊन सुमारे 341 वर्ष झालेली आहेत. तरी देखील जनमानसावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव अजूनही खोलवर जाणवतो. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांच्याच मनात शिवरायांबद्दल अपार श्रद्धा व आदर आपणास दिसून येतो. सामान्यातील सामान्यपासून थोर व्यक्तींच्या मनावर महाराजांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा ठसा कायमस्वरूपी उमटलेला आहे. आजही छत्रपती शिवरायांच्या नाम घोशांणी तरुण पिढीमध्ये उत्साहाचा संचार होत असल्याचे प्रत्ययास येत आहे. देशातील प्रत्येकालाच शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते असे वाटते, कारण महाराजांनी ज्या काही कल्याणकारी योजना केल्या त्या सर्वसामान्य लोकांसाठी केल्या असल्याने त्यांना शिवराय हे रयतेचे हितकर्ता होते असे वाटणे स्वाभाविक आहे.

शिवरायांचे संपूर्ण जीवनचरित्र आदर्श होते. त्यांच्या बोलण्यातून, विचारांतून, व वर्तनातून त्यांचे आदर्श पहावयास मिळतात. शिवराय हे एक आदर्श पुत्र, पती, पिता व रयतेला मायेची ऊब देणारे "जाणता राजा" होते. तसेच त्यांचा सर्व धर्मविषयीचा आदर असे सर्व अद्वितीय गुण त्यांच्या जीवनचरित्रातून अनुभवता येतात. शिवराय हे त्यांच्या वारसा हक्काने मिळालेल्या गादीवर बसून राज्य करणारे राजा नसून त्यांनी त्यांच्या स्वकर्तृत्वाने, मेहनतीने, हिंमतीने, चिकाटीने, धैर्याने, धाडसाने, प्रामाणिकपणाने व नैतिकतेने राज्य करणारे तसेच दुसऱ्यांच्या वर्चस्वखाली दबावात न राहता स्वतःचे स्वतंत्र राज्य स्थापन करून शून्यातून जग निर्माण करणारे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक होते. त्यांनी फक्त मराठ्यांपूरताच मर्यादित लोककल्याणकारी योजना न करता त्यांनी त्यांच्या अष्टप्रधान मंडळात इतर धर्माच्या लोकांनाही त्यांच्या कामगिरीनुसार सन्मानाचे स्थान देऊन आपल्या कारभारात समाविष्ट करून घेतले होते आणि ते त्यांच्या या दूरदृष्टीकोनामुळे जनतेच्या हृदयात जागा करू शकले. आजही त्यांचे नाव प्रेमाने व सन्मानाने घेतले जाते व त्यांना मानाचा मुजरा केला जातो. किंबहुना त्यांना एखाद्या देवा प्रमाणेच पूजले जाते.

 ©EIJMR All rights reserved.

## संशोधनाची उद्दिष्टे :

संशोधन करीत असताना संशोधन कोणत्या विषयाशी संबंधित आहे व या अभ्यासाची उद्दिष्टे कोणती आहेत हे ठरविणे संशोधनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असते, कारण यावरच संशोधनास दिशा मिळत असते. छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श व्यक्तिमत्व या विषयावर लक्ष केंद्रित करून हा संशोधन लेख तयार केला आहे.

1) शिवरायांचा स्त्रीविषयक दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.
2) शिवरायांचा सर्वधर्मसहिष्णुतेचा अभ्यास करणे.
3) रयतेची जाणीव असल्याने त्यांना जाणता राजा शिवरायांची महती समजून घेणे.

## संशोधनाची गृहीतके :

1) शिवरायांना स्त्री विषयक आदर भाव होता व पर स्त्री मातेसमान होती.
2) शिवरायांना कुठल्याही धर्माविषयी पक्षपात नव्हता.
3) शिवराय प्रजावत्सल होते.

## प्रकरण योजना :

शिवरायांचा स्त्री विषयक दृष्टिकोन :

शिवरायांसाठी प्रत्येक स्त्री ही मातेसमान होती. महाराजांच्या काळी आणि सरंजामदारीच्या काळात विशेषतः गोरगरिबांच्या स्रियांच्या अब्रूला किंमत नव्हती. राजेरजवाडे व राजपुत्र तर सोडाच पण ; सरदार, वतनदार, जमीनदार, देशमुख तसेच पाटील यांच्या दृष्टीने गोरगरिबांच्या लेकी-सुना म्हणजे त्यांना हवे तेव्हा उपभोगाच्या वस्तू होत्या. दिवसाढवळ्या त्यांची अब्रू लुटली जात होती, परंतु त्याविरुद्ध कुणाकडे दाद मागता येत नव्हती. ज्यांच्याकडे न्याय मागायला जात उलट तेच अब्रू लुटत. अब्रू लुटणाऱ्यांना मानपान अन पदव्या दिल्या जात.

अशा काळात शिवाजी महाराजांचा यासंबंधीचा दृष्टिकोन पूर्णतः वेगळा होता. रांझाच्या पाटलाची गोष्ट प्रसिद्ध आहे. गावच्या वतनदार पाटलाने गरीब शेतकऱ्याच्या तरुण मुलीला भरदिवसा सर्वांसमक्ष उचलून नेली अन तिची अब्रू घेतली. माती झालेल्या जगण्यापेक्षा मरण बरं, म्हणून मुलीने आत्महत्या केली. सारा गाव हळहळला. परंतु काहीही करू शकला नाही. महाराजांच्या कानी ही गोष्ट आली. पाटलाच्या मुसक्या बांधून पुण्यात आणले गेले आणि हातपाय तोडण्याची शिक्षा सुनावली गेली. शिक्षा फक्त सुनावलीच गेली नाही तर तिची त्वरित अंमलबजावणी देखील केली गेली. त्यामुळे साऱ्या मावळखोऱ्यात आश्चर्य पसरले. गरीब रयतेच्या पोरीची अब्रू घेतली म्हणून वतनदार पाटलाला सक्त कठोर शिक्षा झाल्याचं पाहून रयत महाराजांवर फिदा झाली. रयतेच्या संरक्षणासाठी शिवाजी महाराज अशाप्रकारे कार्य करीत असेल तर त्या कार्यासाठी मरायला तयार झाली.

परकीय शत्रूची स्त्री जरी असेल तरीही तिचा तितकाच सन्मान केला जाई. नियम सर्वांसाठी सारखाच असे. मग तो तो कुशल सेनापती जरी असेल पण त्याने क्रूर काम केलं असेल तर त्याची गय केली जात नसे. सकूची गायकवाड नावाच्या सेनापतीने विजयाच्या उन्मादात सूड भावनेने बेळवाडीच्या किल्ल्याची किल्लेदार सावित्रीबाईवर बलात्कार केला हे ऐकून महाराज अतिशय संतापले व त्यांनी सकूजी गायकवाडाचे डोळे काढावयास लावले आणि त्याला जन्मभर तुरुंगात कैद केले. यावरून लक्षात येते की, शिवाजी महाराज चारित्र्यसंपन्नतेत निष्णात होते.

## शिवरायांना सर्व धर्माविषयी समान आदरभाव :

शिवरायांच्या काळातील भारतीय समाजातील रूढी - परंपरा, चालीरिती, सामाजिक जीवन अत्यंत भिन्न प्रकारचे दिसून येते. परंतु महाराजांनी स्वराज्याच्या कामी सर्व जातीजामातींना जवळ केले. सर्व

जातीधर्मातील लोकांना स्वराज्याच्या कारभारात स्थान दिले. कधीही जात-धर्म न पाहता माणसाची योग्यता पाहून ते कामावर ठेवत. शिवरायांच्या आरमारी दलात कोळी, भंडारी तसेच मुसलमानही होते. महार, रामोशी इत्यादी मंडळींनाही स्वराज्याच्या कारभारात स्थान दिले होते. राज्याकारभाराचे काम ब्राम्हण व प्रभू जमातीकडे सोपावले होते शिवरायांच्या सैन्यात हेटकरी होते, मराठे होते, मुसलमान होते. त्यांच्या पायदळात नूर बेग हा एक प्रमुख सेनानी होता. त्यांच्या आरमार दलातील अधिकारी दौलतखान, सिद्धी मिसरी तसेच त्यांचा वकील काझी हैदर हे मुसलमान होते. कुतुबशहा आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची गोवळकोंडा येथे बरोबरीच्या नात्याने झालेली हृदय भेट भारतीय समाजाला ऐक्याची नवी दिशा दाखवणारी आहे. मोहिमेवर असताना शिवरायांनी मशिदिंना उपद्रव केला नाही. कुरान शरीफची एखादी प्रत हाती लागल्यास ते ती प्रत सन्मानाने सोपवून देत. लढाईत हाती लागलेल्या कोणाही स्त्रियांच्या अब्रूस मग ती भलेही ती शत्रूची मुस्लिम स्त्री असो पण त्यांच्या अब्रूसही कधी धक्का लागू दिला नाही. त्यांना सन्मानाने त्यांच्या राज्यात परत केले. कोणी मुसलमान आहे म्हणून ते त्याचा द्वेष करीत नसत. कोणी हिंदू धर्म सोडून मुस्लिम धर्म स्वीकारला असेल पण पुन्हा त्याला स्वतःच्या धर्मात परत यावे असे वाटत असेल तर ते त्यास दूर न लोटता त्याला हिंदू धर्मात पुन्हा सन्मानाने स्वीकारले जाई.

छत्रपती शिवाजी महाराज धार्मिक स्वातंत्र्याचे पुरस्करते होते. नेताजी पालकर व बजाजी नाईक निंबाळकर यांना त्यांनी पुन्हा हिंदू धर्मात घेऊन आश्रय दिला. शिवरायांच्या धार्मिक उदार धोरणाविषयी सभासद बखरीत उल्लेख येतो तो पुढीलप्रमाणे... मुलखात देव, देवस्थान, जागोजागी असून त्यास दिवाबत्ती, नैवद्य, अभिषेक स्थान पाहून यथायोग्य चालविले. खाफिखान आणि बर्नियर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण उच्च प्रतीचे होते असे म्हटले आहे. औरंगजेबचा इतिहास लिहिणारा गाफिखान हा शिवरायांच्या धार्मिक धोरणाची प्रशंसा करताना लिहितो की, ज्या प्रदेशात शिवाजी लूट करण्यासाठी जाई त्या प्रदेशातील मस्जिद, कुराण, स्त्री यांना धक्काही लागू देत नसत. कुराण ग्रंथ कुणाच्या हाती पडला तर तो आपल्या मुसलमान सेवकाला देत असत. महाराजांनी प्रताप गडाच्या पायथ्याशी अफजल खानाची व सय्यद बंडाची त्यांनी बांधलेली कबर धार्मिक सलोखा वाढविणारी घटना आहे. शिवरायांनी मुस्लिम इनामदारांचे इनाम अबाधित राखले. मुस्लिम म्हणून ते जप्त केले नाही. सर्वांना समान न्यायाने वागविले. ज्या मुस्लिमांकडे स्वराज्यातील इनाम जमिनी होत्या त्यावरील त्यांचा हक्क राजांनी अबाधित ठेवला होता.

शिवराय सुफी पंथाचा आदर करणारे असून त्यांनी सुफी संत बाबा शरीफउद्दीन यांची प्रार्थना उपयोगात आणल्याचे उल्लेख आहेत. शिवाजी महाराजांचे दैवत आई भवानी असून ते आस्तिक असूनही त्यांचा सामाजिक, धार्मिक सुधारणावाद वैज्ञानिक पद्धतीचा होता असे लक्षात येते.

महाराजांना अस्पृश्यता, भेदभाव मान्य नव्हते. गरीब जनतेचे रक्षण ते ते आपले कर्तव्य मानीत असत.

### रयतेची जाण असलेला जाणता राजा :

शिवरायांना त्यांच्या वडिलांकडून केवळ लहानशी जहागीर मिळाली होती. या लहानश्या जहागीरीतून त्यांनी "स्वराज्य" निर्माण केले. त्यांना लहानपणी लोकांचा छळ बघितला त्यामुळे त्यांनी लोकांना जागृत करून स्वाभिमानी बनवले, लोकांची संघटना उभारली. महाराजांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून शत्रुंचा पराभव करून न्यायाचे स्वराज्य निर्माण केले. त्या स्वराज्याची चोख व्यवस्था लावली. त्यामुळे प्रजा सुखी झाली.

शिवरायांची आपल्या सेवकांवर मोठी माया होती. बाजीप्रभू देशपांडेने देशासाठी मरण पत्करले. शिवरायांनी त्यांच्या मुलाचे संगोपन केले. तानाजीने राज्यासाठी आत्मबलिदान केले. शिवरायांनी स्वतः त्याच्या गावी जाऊन रायबाचे लग्न करवून दिले त्यास आपल्या मायेचे छत्र दिले. आग्ऱ्याच्या कैदेत मदारी मेहतर याने आपला जीव धोक्यात घातला. शिवरायांनी शेवटपर्यंत त्यांना अंतर दिले नाही. प्रतापराव गुजर याने स्वराज्यासाठी प्राण अर्पण केले. शिवरायांनी त्यांच्या लेकीचे लग्न आपला दुसरा मुलगा राजाराम

याच्याशी केले अश्या कितीतरी गोष्टी आहेत. शिवराय राजे असूनही त्यांनी आपल्या सेवकांची एखाद्या पित्याप्रमाणे काळजी घेतली.

शिवराय शौर्यवान, धाडसी, पराक्रमी, नितीमान असे थोर राजे होते. शिवाय मनानेही मोठे दिलदार होते. त्यामुळे त्यांच्या अंगी असलेल्या अलौकिक गुणांमुळे त्यांची आपल्या राज्यात ख्याती होती. आणि त्यांची ही ख्याती फक्त स्वराज्यातच नाही तर दुरवर इतर देशातही पसरलेली होती. त्यामुळेच त्यांना लोककल्याणकारी, समाज सुधारक, रयतेचा कैवारी तसेच जाणता राजा असे विविध विशेषणे देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांची पासिद्धी, ख्याती, लोकप्रियता आजपर्यंत तिळमात्रही कमी झालेली दिसून येत नाही. आजही लोकं त्यांना आपले आराध्य दैवत मानतात.

## निष्कर्ष :

अशाप्रकारे छत्रपती शिवाजी महाराज हे प्रत्यक्ष स्वकृतीतून समाजसुधारक राजे होते. ते वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले राजे होते. त्यांचा समाजातील विविध जाती धर्माच्या लोकांना प्रशासनात सामावून घेऊन अस्पृश्यता व भेदभाव नष्ट करणे, जातीय, धर्मीय तसेच राष्ट्रीय सलोखा वाढविणे असा त्यांचा सुधारणावादी दृष्टिकोन होता. त्यांच्या जीवनचरित्रातून विनम्रता, प्रेम, बंधुता, धाडस, पराक्रम, शौर्य, नीतिमत्ता आपल्या विशाल हृदयात सर्वांना सामावून घेणारे उदार मतवादी, स्त्रीयांविषयी व धर्माविषयी आदरभाव, शून्यातून स्वराज्याची निर्मिती करणारे असे अनेक सद्गुण आपणांस पहावयास मिळतात. अशा या आदर्श व्यक्तिमत्व धरवणारे "जाणता राजा" छत्रपती शिवाजी महाराज यांना मानाचा मुजरा !!!

## संदर्भ

1) पुस्तक शिवचरित्र, लेखक पुरुषोत्तम खेडेकर, पब्लिशर जिजाई प्रकाशन.
2) सह्याद्री बुक्स www.sahyadri.com
3) शिवाजी कोण होता गोविंद पानसरे, प्रकाशन विश्वासराव लोकवाडमय गृह भूपेश गुप्ता भुवन 85 सयानी रोड, प्रभा देवी मुंबई 400025
4) सावंत ( प्रा.) बी. एस. जाधव ( प्रा.) व्ही. के. मराठ्यांचा प्रशासकीय आणि सामाजिक, आर्थिक इतिहास, विद्या प्रकाशन नागपूर 1997
5) आठल्ये ( डॉ.) विभा, मराठ्यांचा इतिहास, अंशुल पब्लिकेशन नागपूर 2000
6) http://en.wikipedia.org/wiki/shivaji
7) सरदेसाई गोविंद सखाराम, मराठोका नवीन इतिहास शिवलाल अग्रवाल एन्ड कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, 1963
8) शिवछत्रपती ( परिसर अभ्यास -भाग 2 )इयत्ता चौथी, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे 411004
9) शिव - छत्रपतीचे चरित्र, कृष्णाजी अनंत सभासद - विरचित, टांकन : मृणाल भिडे
10) क्षत्रियकुलावंतस छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र, कृष्णराव अर्जुन केळूसकर, मुंबई
11) छत्रपती शिवाजी, मूल लेखक लाला लजपतराय, प्रकाशक : विजयकुमार गोविंदपुरम हासानंद 4408, नई सडक, दिल्ली 110006
12)श्रीमानयोगी "ebook converter DEMO -www.ebook-converter.com
प्रकाशक सुनील अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस,1941, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे 30